# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३**

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०४५, विक्रेय वस्तू व सेवा यावरील इतर कर व शुल्क**<br>**बाब क्रमांक: ६५, रूपये:- ४,५२,४७,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (१) | ४८२३ | १० | "मुंबई येथील मुख्य विद्युत निरीक्षक कार्यालयातील वीज शुल्क शाखा आणि विद्युत निरीक्षण शाखा यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जात असताना भर उन्हाळ्यात महावितरण कंपनीने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे प्रति युनिट 2.35 रुपयांची वाढ माहे जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात मागितलेली असणे, दरम्यानच्या काळात त्याची जाहिरात प्रसिद्ध होऊन हरकती सुनावणीनंतर विद्यमान अधिवेशनाच्या अखेरीस ही प्रचंड वीज दरवाढ राज्यातील सामान्य नागरिकांच्या माथी मारली जाण्याची शक्यता, महावितरणच्या समवेत मुंबईत बेस्ट, टाटा आणि अदानी या वीज कंपन्यांनी देखील दरवाढीसाठी आयोगाकडे प्रस्ताव सादर केलेला असणे, एकीकडे महानिर्मिती खाजगी पुरवठादाराकडून महागड्या दराने वीज घेत असताना चालू वर्षासाठी आयोगाने वीज खरेदीचा प्रति युनिट दर ४.३८ रुपये निश्चित केला असताना प्रत्यक्षात महानिर्मितीने महागड्या दराने वीज घेतलेली असणे, परिणामी खाजगी पुरवठादारांची वीज त्या काळात महाग झालेली असताना राज्यामध्ये संपूर्ण देशात अधिक दर आकारला जात असल्यामुळे राज्यातील नागरिकांच्या मनामध्ये निर्माण झालेली नाराजीची भावना, यासंदर्भात वीज वितरण कंपन्यांनी आपला आस्थापना खर्च, विजेची गळती, वीज चोरी इत्यादी बाबींवर लक्ष देऊन विजेचे दर संपूर्ण देशात समकक्ष समक्ष ठेवण्याची आवश्यकता आणि याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना" |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग**<br>**बाब क्रमांक: ६७, रूपये:- ३,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (२) | ४८२० | १० | "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमावर शासन मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करीत असते तथापि अनेक नवउद्योजक, बेरोजगार तरुणांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मितीमध्ये कर्ज मर्यादा वाढवावी अशा प्रकारची मागणी केलेली असणे, राज्य शासनाने सुशिक्षित बेरोजगारांना स्वतःचे उद्योग सुरू करता यावे व याद्वारे रोजगार निर्मिती व्हावी या उद्देशाने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम सुरू केलेला असणे, या कार्यक्रमांतर्गत उत्पादन उद्योगासाठी 50 लाख तर सेवा उद्योगासाठी 20 लाख कर्ज मर्यादा उपलब्ध करून |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | दिलेली आहे, या योजनेअंतर्गत लाभार्थ्याला स्वतःचा पाच ते दहा टक्के वाटा भरावा लागत असणे, आणि उर्वरीत वाटा शासन उचलत असताना राज्यात सुमारे 40 ते 50 हजार तरुणांनी वर्षभरात लाभ घेतलेला असणे, तथापि मोठ्या प्रमाणावर बेरोजगार तरुणांची या योजनेत लाभ घेण्यासाठी प्रतीक्षा यादी प्रलंबित असणे, तसेच ही कर्ज मर्यादा वाढवण्याची होत असलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५२, उद्योग**<br>**बाब क्रमांक: ६८, रूपये:- ३,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (३) | ४८३० | १० | बुलडाणा जिल्ह्यातील नांदुरा येथे रेल्वे ची सुविधा उपलब्ध असुन, शहरालगत मलकापूर-नांदूरा खामगांव रोडवर मोठ्या प्रमाणात शासकीय जमीन उपलब्ध आहे. १०२ लहान-मोठे गावे व नांदुरा शहर ता. नांदुरा जि.बुलढाणा येथील वाढती व्याप्ती तसेच लोकसंख्या व त्या अनुषंगाने उद्योगधंदे, औद्योगिक विकास क्षेत्राचा असलेला अभा त्यामुळे सुशिक्षित युवकांमध्ये बेरोजगारीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. करिता सुशिक्षित व कुशल तरुणांच्या हाताला काम व रोजगार मिळण्याच्या अनुषंगाने नांदुरा जि.बुलढाणा येथे नवीन औद्योगिक विकस क्षेत्र (एम.आय.डी.सी.) मंजुर करणे बाबतची मागणी सातत्याने होत आहे हे यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके** |
| (४) | ४७५४ | १० | महाराष्ट्र शासनाने नवीन औद्योगिक धोरण २०१९ मध्ये एकत्रित प्रोत्साहन योजना जाहिर करणे, या मध्ये लघु, मध्यम, मोठ्या घटकांना तसेच विशाल प्रकल्पांना विविध प्रोत्साहन अनुदान जाहिर करणे, परंतु यामध्ये सहकारी साखर उद्योगाचा समावेश न करणे, या योजने मध्ये सहकारी साखर उद्योगाचा समावेश करण्याबाबत लोकप्रतिनिधीने मा.मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. उद्योग मंत्री यांना वेळोवेळी निवेदन देणे, परंतु याकडे शासनाचे दुर्लक्ष असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई